MHKO100000282024

**नियमीत दिवाणी दावा क्र. ४/२०२४**

अर्जून गोविंद धबाले.
विरुध्द
सुनिल शामराव धबाले वगैरे.

**निशाणी क्रमांक ५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ने निशाणी क्र.१८ येथे त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ हजर होऊन देखील कैफियत न दिल्याने तिचेविरुध्द विना कैफियत व म्हणणे चा आदेश पारीत करणेत आलेला आहे.

२. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने असे शाबीत केले काय की, त्याच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | होय. |
| २. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने आहे ? | होय. |
| ३. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करणेत येतो. |

**कारणमिमांसा**

**दावा मिळकतीचे वर्णन-**

३. मौजे बेकनाळ, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथील गट क्र.५८० मधील क्षेत्र ०-३४ आर, आकार रु. ०-७० पैसे या मिळकतीमध्ये एकूण तीन ठिकाणी यासी चतुःसिमा खालीलप्रमाणे-

**ठिकाण क्र.१: क्षेत्र ०-१० आर**

पूर्वेस - अशोक व महादेव भिमा धुमाळ यांची याच गटातील मिळकत,

पश्चिमेस - याच गट नंबरमधील ठिकाण क्र.११ ची मिळकत,

दक्षिणेस - ईश्वर लोहार यांची मिळकत,

उत्तरेस - अशोक व महादेव भिमा धुमाळ यांची याच गटातील मिळकत.

**ठिकाण क्र.२: क्षेत्र ०-१८ आर**

पूर्वेस - गोपाळ गणपती सुतार यांची मिळकत,

पश्चिमेस - रस्ता,

दक्षिणेस - अशोक व महादेव भिमा धुमाळ यांची याच गटातील मिळकत,

उत्तरेस - याच गट क्रमांकामधील ठिकाण क्र. ६,१६,१७ ची मिळकत.

**ठिकाण क्र.३ क्षेत्र ०-०६ आर**

पूर्वेस - याच गट क्रमांकामधील ठिकाण क्र.१८ ची मिळकत,

पश्चिमेस - शिवाजी कृष्णा धबाले यांची मिळकत म्हणजेच याच गट क्रमांकामधील ठिकाण क्र.६ ची मिळकत,

दक्षिणेस - याच गट क्रमांकामधील ठिकाण क्र. १७ ची मिळकत,

उत्तरेस - आप्पासो व अनंत जगताप यांची मिळकत.

वरनमुद मिळकती हया प्रस्तुत दाव्याचा विषय असुन यापुढे या मिळकतींना "दावा मिळकती" म्हणून संबोधण्यात येईल.

४. वादीने त्याच्या कथनांच्या पुष्टयर्थ निशाणी क्र.३ येथे खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली आहेतः-

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | गट क्र.५८० चा सन २०२३-२४ सालचा ७/१२ उतारा. |
| ०२. | सर्व्हे क्र.८३ चा सन १९५७-५८ ते १९६६-६७ सालचा ७/१२ उतारा. |
| ०३. | सर्व्हे क्र.८३ चा सन १९६७-६८ ते १९७६-७७ सालचा ७/१२ उतारा. |
| ०४. | भूमापन क्र.५८० चा सन १९८२-८३ ते १९९१-९२ सालचा ७/१२ उतारा. |
| ०५. | भूमापन क्र.५८० चा सन १९९३-९४ ते २००२-०३ सालचा ७/१२ उतारा. |
| ०६. | फेरफार क्र.५६९ चा उतारा. |
| ०७. | फेरफार क्र.५७१ चा उतारा. |
| ०८. | फेरफार क्र.९१८ चा उतारा. |

| | |
|---|---|
| ०९. | फेरफार क्र.२७२ चा उतारा. |
| १०. | फेरफार क्र.२८२ चा उतारा. |
| ११. | फेरफार क्र.१८८ चा उतारा. |

५. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**प्रश्न क्रमांक १ ते ३ करीताः -**

६. वरील सर्व प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचेवर एकत्रीतपणे चर्चा करण्यात येत आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, दावा मिळकती हया व्यंकटेश जोशी यांचेकडे इनाम स्वरुपाच्या होत्या व त्या वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार यांचेकडे कुळ नात्याने कसवणुकीस होत्या. त्यानंतर, वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार व वादी यांनी सदर जमीनीच्या आकाराची रक्कम भरल्यानंतर ती त्यांना मालक म्हणुन बहाल करण्यात आली. त्यानंतर, सदर जमीनीमध्ये वादी व त्याचे भाऊ आणि इतर सहहिस्सेदार यांचेदरम्यान वाटप होऊन दावा मिळकती वादीचे स्वतंत्र कब्जेवहिवाटीस देण्यात आल्या. तसेच, दावा मिळकत गट क्र.५८० मधील इतर क्षेत्र प्रतिवादींचे हिस्सेत देण्यात आले होते. परंतु, प्रतिवादी क्र.१ हे नोकरीनिमीत्त मुंबई येथे राहत असल्याने व प्रतिवादी क्र.२ यांचे पती पूर्वी नोकरीनिमीत्त परगावी राहत असल्याने व सेवानिवृत्त झाल्यानंतर अमेरिकेमध्ये गेल्याने त्यांनी त्यांच्या हिश्यात आलेली मिळकत अन्य लोकांना कसवणुकीस दिलेली आहे. ज्या लोकांना प्रतिवादींनी मिळकत कसवणुकीस दिली ते लोक सदर मिळकती सोडण्यास तयार नसल्याच्या रागापोटी प्रतिवादी हे दावा मिळकतींमध्ये त्यांचे हक्क सांगून वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे, प्रतिवादी यांनी वादीचे दावा मिळकतींमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व हुसकावून लावू नये असा त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेशाची विनंती केली.

७. याऊलट, प्रतिवादी क्र.१ चे कथनाप्रमाणे वादीने दावा मिळकतींचे वर्णन चुकीचे नमुद केले असुन सोबत जोडलेला नकाशा व त्यामधील विभागणी देखील चुकीची नमुद केलेली आहे. दावा मिळकत ही इनाम स्वरुपाची होती व वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार ती कसत होते. वादीने कथन केल्याप्रमाणे दावा मिळकती त्याचे हिस्सेमध्ये

वाटपादरम्यान दिलेले नसुन वादी हा दावा मिळकतींचा मालक नाही. दावा मिळकत ३४ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कब्जेवहिवाटीस मालक नात्याने दिल्यानंतर कसवणुकीसाठी वादीकडे दिली होती. वादी हा सुरुवातीला दरवर्षी त्यामध्ये निघणा-या पिकातुन काही हिस्सा प्रतिवादी यांना देत होता व त्यानंतर गेली ५ ते ६ वर्षे काहीही दिलेले नाही. त्याबाबत विचारणा केली असता वादी हा काही बोलणेस तयार नसुन दावा मिळकती त्याचे हिश्यास दिल्याचे मोघम कथन करतो. दावा मिळकतींचे ७/१२ पत्रकी वादी व प्रतिवादी यांची प्रत्येकी ३४ आर क्षेत्रास नांवे नमुद आहेत. वादीने दाव्यासोबत जोडलेल्या नकाशामध्ये १९ ठिकाणे दाखविली असुन त्यापैकी १ ते ३ ठिकाणे वेगवेगळया ठिकाणी दर्शविलेली असल्याने दावा मिळकतींचा खुलासा होत नाही. तसेच, दावा मिळकतींचे ७/१२ उता-यावर प्रत्येकी ३४ आर क्षेत्राचे ५ हिस्से केलेले असताना वादीने परत १९ हिस्से दर्शविले आहेत. शिवाय, वादीने प्रतिवादी यांचे हिस्सेत असलेले प्रत्येकी ३४ आर क्षेत्र कोणत्या ठिकाणी आहेत ते देखील नकाशामध्ये दर्शविलेले नाही. तसेच, वादीने नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे ठिकाण क्र.११ ते १९ हया मिळकती वेगवेगळया व्यक्तिंच्या वहिवाटीत असताना त्यांना या दाव्यात पक्षकार केलेले नाही. दावा मिळकती हया प्रतिवादी यांच्या मालकीच्या असल्याने वादीचे कथनात कोणतेही तथ्य नाही. प्रतिवादी क्र.१ हा मुंबई येथे राहत असल्याचा व प्रतिवादी क्र.२ ही महिला असुन ती आजारी असल्याचा गैरफायदा घेऊन प्रस्तुतचा खोटा दावा व अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

८. दोन्ही बाजूंच्या कथनांचे अवलोकन कले असता असे दिसून येते की, दावा मिळकती हया पूर्वी वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार यांचेकडे कब्जेवहिवाटीस होत्या. वादीचे कथनाप्रमाणे दावा मिळकती हया वाटपामध्ये त्याचे हिस्सेस दिलेल्या आहेत. परंतु, सदर बाब प्रतिवादी यांनी नाकारलेली असुन त्यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकती त्यांचे हिस्सेस देण्यात आलेल्या आहेत. याबाबत, वादीतर्फे दाखल दावा मिळकत गट क्र. ५८० चा सन २०२३-२४ सालचा ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचे हिस्सेमध्ये प्रत्येकी ३४ आर क्षेत्र दर्शविण्यात आलेले आहे. त्यामुळे, दावा मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी यांची प्रत्येकी ३४ आर क्षेत्राची मालकी असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

९. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींविरुध्द त्याचे कब्जेवहिवाटीस हरकत

अडथळा करु नये याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ याने दाखल केलेल्या कैफियतीमध्ये त्याने दावा मिळकतींवर वादीची मालकी नाकारलेली आहे. त्याने दावा मिळकतींवर स्वतःचे मालकी हक्क सांगितले आहे परंतु, दावा मिळकती हया वादीकडे कसवणुकीसाठी दिलेबाबत प्रतिवादीने मान्य केलेले आहे. शिवाय, त्यानंतर दावा मिळकतींचा कब्जा हा वादीने प्रतिवादी यांचेकडे दिलेबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे, याघडीला प्रतिवादी क्र.१ याने कैफियतीमध्ये केलेल्या कथनानुसार दावा मिळकती हया वादीकडे कसवणुकीसाठी दिलेल्या असल्याचे मान्य केल्याने दावा मिळकती वादीचे कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१०. याशिवाय, प्रतिवादीने त्याचे कैफियतीमध्ये एके ठिकाणी वादीने दाखल केलेला नकाशा व त्यामधील पडलेले भाग नाकारलेले आहेत. परंतु, दुस-या ठिकाणी प्रतिवादीने सदर पडलेल्या भागांपैकी भाग क्र.११ ते १९ मधील वेगवेगळया व्यक्तिंची नांवे नमुद करुन त्यांची कब्जेवहिवाट असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, याघडीला वादीने कथन केल्याप्रमाणे व दाव्यासोबत दाखल नकाशाप्रमाणे दावा मिळकतींचे भाग पडल्याची बाब प्रतिवादीस मान्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

११. याव्यतिरिक्त महत्वाची बाब म्हणजे, प्रतिवादींनी दावा मिळकतीवर त्यांची कब्जेवहिवाट अथवा मालकी असल्याचे दर्शविण्याकरीता कोणताही पुरावा याघडीला दाखल केलेला नाही. त्यामुळे, प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये केलेले कथन पुराव्याविना शाबीत होत नाही. याऊलट, वादीने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन दावा मिळकत गट क्र.५८० मध्ये वादी व प्रतिवादी यांची प्रत्येकी ३४ आर क्षेत्रावर मालकी असल्याचे दिसुन येते. वादीने दाव्यात दावा मिळकतींचे क्षेत्र ३४ आर नमुद केलेले असुन प्रतिवादींनी कैफियतीमध्ये सदर क्षेत्र वादीचे कसवणुकीस असल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे, याघडीला दावा मिळकती हया वादीचे कब्जेवहिवाटीस असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१२. एकंदरित वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे कथन व दाखल पुराव्यानुसार दावा मिळकती हया वादीचे कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादीने कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतींवर त्यांचा हक्क सांगून त्याचे दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. वरनमुद प्रमाणे दावा मिळकती हया

वादीचे कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्याने प्रतिवादींनी कायदेशिर प्रक्रिया न अवलंबता सदर कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्यास वादीचे कधीही नर भरुन येणारे नुकसान होणार आहे. याऊलट, दावा मिळकतींमध्ये प्रतिवादींची कब्जेवहिवाट नसल्याने प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे, माझ्या मते न्यायीक समतोल वादीचे लाभात आहे. सबब मी प्रश्न क्र.१ ते ३ चे 'होकारार्थी' उत्तर देत आहे.

**प्रश्न क्रमांक ४ करीताः-**

१३. प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, वादीने मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादी यांनी दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकतींमध्ये वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व त्यामधुन वादीस हुसकावुन लावु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देता येईल. करिता, प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी यांनी स्वतः अथवा त्याचे मार्फत इतर कोणीही प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकती गट क्र.५८० क्षेत्र ३४ आर ज्याचे वर्णन दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केले आहे त्यामध्ये वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व त्यामधुन वादीस हुसकावुन लावु नये असा त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येतो.

०३. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
RATHOD SUJIT
Date: 2025.02.20
17:19:22 +0530

दिनांकः २०/०२/२०२५.
गडहिंग्लज.

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.